# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०५ मार्च, २०१८ / फाल्गुन १४, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| (१) आदिवासी विकास मंत्री<br>(२) उद्योग, खनिकर्म मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री<br>(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६४**

---

### धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत

**(१) * ३८९२९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेने अभ्यास करुन अहवाल प्रथमत: डिसेंबर, २०१७ अखेर व मुदतवाढीनंतर दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी सादर करणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेने उक्त समाजाच्या सामाजिक व मानव वंशशास्त्रीय दृष्टीकोनातून भाग-१ व भाग-२ अंतर्गत अभ्यास करण्यासंदर्भात तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी ओरॉन, धनगड या अनुसूचित जमाती आणि धनगर ही भटकी जमात असल्यासंदर्भात कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही अहवालाचे स्वरुप काय आहे, अहवाल सादर करण्यास आणखी किती कालावधीत लागणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही होऊन धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देणेबाबत शासन कोणता व किती कालावधीत निर्णय घेणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षण व संशोधनाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील १०८ तालुक्यामधील ३२४ गावांमध्ये भरलेल्या ५००० प्रश्नावली यांचे विश्लेषण मुख्य अहवालामध्ये समावेश करण्याचे काम सुरु आहे. तसेच अभ्यासक, अधिकारी व विशेष तज्ञ यांनी भेटी दिलेल्या विविध पाच राज्यांचा अभ्यास व त्यातुन मिळालेल्या माहितीचे एकत्रिकरण करुन त्याचे संकलन करण्यात आलेले आहे. विविध समित्या व आयोग यांचे अहवाल, भारतीय जाती-जमातींचा मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय व ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास, न्यायालयीन न्यायनिवाडे आणि धनगर समाजातील नागरिकांनी सादर केलेले दस्तावेज या सर्वांचे चिकीत्सक परिक्षण करुन त्यांचे संकलन करण्यात आले असून या संकलनाला मुख्य अहवालामध्ये समाविष्ट करण्याचे काम सुरु आहे.

संकलीत माहितीच्या आधारे मुख्य अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच मुख्य अहवाल टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई या संस्थेकडून सादर करण्यात येणार आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक ०२/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवाल प्राप्त झालेला आहे. टाटा इन्स्टिटट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या अंतिम अहवालानंतरच पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नायगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील गोदा युनियन कृषक सेवा सहकारी संस्थेस पीक कर्जाचे वाटप करण्याबाबत**

**(२) * ३७९०८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील युनियन बँक ऑफ इंडिया यांची अंगीकृत कृषक संस्था असलेल्या गोदा युनियन कृषक सेवा सहकारी संस्थेस व्याज सवलत योजनेसह पीक कर्जाचे वाटप द.सा.द.शे. ७% दराने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय खरे आहे.
(२) युनियन बँक ऑफ इंडिया नायगांव ता.सिन्नर जि.नाशिक या बँकेने सन २०१६-१७ वर्षासाठी मंजूर केलेली पीक कर्जासाठीची व्याज सवलत योजना बंद झाल्याच्या कारणावरून सदर कर्जासाठीचा व्याजदर वाढविला आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या Master Circular दिनांक ०१/०७/२०१४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांनी प्राथमिक कृषी पुरवठा संस्थांना अल्प मुदती पीक कर्ज पुरवठा करताना नाबार्डकडून पुनर्वित्त मिळणाऱ्या रकमेएवढीच रक्कम बँकेच्या बेस रेटपेक्षा कमी दराने करता येईल. बँकेने स्वनिधीतून कर्ज पुरवठा केलेल्या रकमेस बेस रेटपेक्षा कमी व्याजदर लावता येणार नाही असे नमूद केले आहे. तसेच सदर राष्ट्रीयकृत बँकांनी PACS/FSS/LAMPS यांना वितरीत केलेल्या पीक कर्जास व्याज परतावा लागू राहणार नाही, असे स्पष्टीकरण भारत सरकारने रिझर्व्ह बँकेस दिले असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेस कळविले आहे.

सदर बाब केंद्र शासनस्तरावरील असल्याने संबंधित संस्थेस सवलतीच्या व्याजदराने कर्ज पुरवठा करता येत नाही. सदर बाब मा.सदस्यांना कळविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी (जि.यवतमाळ) कृषी उत्पन्न बाजार समितीस बाजार व देखरेख शुल्क अदा करण्याबाबत

**(३) * ३८२९६ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) कृषी उत्पन्न बाजार समितीने माहे मे-जून, २०१७ या महिण्यात नाफेडमार्फत खरेदी केलेल्या २५,११२,२३ क्विंटल तुरीची एकूण किंमत रुपये १२,६८,१६,७६१.५० इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी कृषी उत्पन्न बाजार समितीस बाजार व देखरेख शुल्क म्हणून रुपये १३,३१,५७५.९९ इतकी रक्कम जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती, यवतमाळ यांचेकडून अदा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) होय.

हंगाम २०१६-१७ मध्ये राज्यात आधारभूत दराने नाफेडमार्फत व राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत तूर खरेदी करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्ह्यात नाफेडमार्फत २,८७,९९७.९२ क्विंटल तूर खरेदी किंमत रुपये १४५,४३,८९,४९६/- इतकी होती. यवतमाळ जिल्ह्यातील सबएजंट संस्था व बाजार समितीकडून हिशोबाची पूर्तता नुकतीच करण्यात आली असून, नाफेडकडून जस-जशा रकमा प्राप्त होतील त्यानुसार बाजार फी ची रक्कम बाजार समितीस अदा करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी पंप सौर ऊर्जेने जोडण्याबाबत

**(४) * ३७७०४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील तीन वर्षात विदर्भ व मराठवाड्यात वीज जोडणी अनुशेष असलेल्या जिल्ह्यात ४ लाख पेक्षा जास्त वीज जोडण्या देण्यात आल्या असून २ लाखा पेक्षा जास्त नवीन अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगामी दोन वर्षात पाच लाख पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे कृषी पंप सौर ऊर्जाने जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासाठी ३०० मेगावॅटचे सौरऊर्जा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर उभारण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात घेतला असून यासाठी २५ वर्षांचा करार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठीच्या कराराच्या अटी व शर्ती काय असणार आहेत व निर्णयाचे स्वरुप काय आहे तसेच त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विदर्भ व मराठवाडयामध्ये सन २०१४-१५ मध्ये ७६,१०४ सन २०१५-१६ मध्ये १,०१,३३२ व सन २०१६-१७ मध्ये ७१,९४४ असे एकूण मागील तीन वर्षात २,४९,३८० कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. सन २०१७-१८ मध्ये जानेवारी, २०१८ अखेर ३०,४७६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. तसेच, विदर्भ व मराठवाडयामध्ये सन २०१७-१८ मध्ये जानेवारी, २०१८ अखेर १,२२,९३० कृषीपंप पैसे भरून प्रलंबित आहेत.
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २७ मार्च, २०१५ व १४ जून, २०१७ रोजीच्या अटल सौर कृषी पंप आस्थापित करण्याच्या एकत्रित धोरणा बाबतच्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे ७,५४० व २,४६० असे एकूण १०,००० नग सौर कृषी पंप आस्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) राज्यात जानेवारी, २०१८ अखेर ५११८ शेतकऱ्यांचे कृषी पंप सौर ऊर्जेने जोडण्यात आले आहेत.
(४) सौर कृषी पंप आस्थापित करण्यासंदर्भातील प्रगतीचा आढावा, केंद्र शासनाची सदर मान्यतेकरिता असणारी मुदत, केंद्र शासनाव्दारे नवीन ७,००० कृषी पंपांना महाऊर्जामार्फत राबविण्यास दिलेली मंजुरी, अर्थसहाय्यातील बदल लक्षात घेऊन त्यानुसार योजना नवीन स्वरूपात राबविण्याचे प्रस्तावित आहे. परंतु ज्या शेतकऱ्यांनी लाभार्थी हिश्श्याची रक्कम जमा केली आहे त्यांना सद्य:स्थितीतील योजनेत त्यांच्या अनुज्ञेयतेनुसार सौर कृषी पंप देण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## महाडीबीटी पोर्टल या संकेतस्थळावरील त्रुटींमुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत

**(५) * ३७९३८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती स्मिता वाघ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी या संकेतस्थळावर दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी सदर संकेतस्थळावरील त्रुटीमुळे राज्यातील लाखो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या सदोष कामामुळे मागील तीन वर्षापासून ५५ लाख विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती मिळालेली नसल्याने ऑनलाईन नोंदणी बंद करुन ऑफलाईन शिष्यवृत्ती वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदेतील अटी व शर्तीनुसार सिस्टीम इंटीग्रेटरने विहित मुदतीत कामकाज पार न पाडल्यास प्रतिमाह प्रकल्प रकमेच्या २ टक्के दंड आकारण्याची व एकूण दंडाची रक्कम १० टक्क्यापर्यंत गेल्यास करारनामा रद्द करण्याची तरतूद असताना सबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑफलाईन पध्दतीने किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली व उर्वरीत विद्यार्थ्यांना किती दिवसात शिष्यवृत्ती वितरीत करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय.

(२) सन २०१७-१८ या वर्षापासून विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या डीबीटी प्रणालीचा पुर्णत: वापर करणे शक्य न झाल्याने, सदर योजनांसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारुन पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर लाभ अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

सन २०१६-१७ अखेर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज हे जुनी महा-ईस्कॉल प्रणाली कार्यान्वित करुन त्याद्वारे निकाली काढण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(३) माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत महाडीबीटी प्रणालीवरील त्रुटींचे लेखापरीक्षण करण्यात येत असून, लेखापरिक्षणाचे निष्कर्ष प्राप्त झाल्यावर, माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत निविदेतील अटी व शर्ती आणि करारनाम्यातील तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) सन २०१६-१७ अखेर प्रलंबित २,८७,२८६ विद्यार्थ्यांच्या अर्जापैकी १,८९,३१९ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्री-शिप अदा करण्यात आलेली असून उर्वरित ६८,२४५ पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्री-शिप अदा करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे

सन २०१७-१८ मध्ये नुतनीकरणाच्या एकूण १,७७,८३८ अर्जापैकी १०,५८२ अर्जांचे देयक तयार करण्यात आले असून संबंधित विद्यार्थ्यांना त्यावरील लाभ अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील नुतनीकरणाचे प्रलंबित अर्ज व सन २०१७-१८ मध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत निकाली काढण्याच्यादृष्टीने क्षेत्रियस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील जमीन विक्रीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६) * ३७७२१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रात जमिनीतील भागीदाराच्या मृत्यूनंतर बनावट कागदपत्रे बनवून रुपये दहा कोटीपेक्षा अधिक किंमत असलेला भूखंड परस्पर विक्री केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी, फारोख मुकादम, व्यवहार करणारे मालक, सहभागीदार आणि दलाल यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश संबंधितांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशानुसार संबंधित दोषींवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्यानुसार त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) बाब निदर्शनास आली हे खरे आहे.

(२) म.औ.वि. महामंडळाच्या तारापूर औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. F-३/१ व भूखंड क्र. F-३/८ भूखंडाचे भूधारक M/s Esskay Stell Rolling Mills यांचे नावावरुन सदर भूखंडाचे हस्तांतरण M/s Martis Pharma Pvt Ltd यांच्या नावे केल्या प्रकरणी मा.न्यायालय, पालघर येथे दाखल केलेल्या Criminal case ३६/२०१६ बाबत मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तिसरे न्यायालय, पालघर यांनी दिनांक ०६/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्याचे आदेश पारित केले आहेत. परंतु मा.जिल्हा न्यायालय, पालघर यांचे दिनांक २४/०१/२०१८ च्या आदेशान्वये स्थगिती प्राप्त झाल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) सदरील प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असून मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पालघर यांच्या आदेशास मा.जिल्हा न्यायालय, पालघर यांनी दिनांक २४/०१/२०१८ च्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे मा.न्यायालयाच्या आदेशान्वये संबंधित दोषीवर अद्यापपर्यंत कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुटुंबातील एका व्यक्तीला दिलेल्या जात प्रमाणापत्रावरुन त्याच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबत

**(७) * ३८८८४ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७८८ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुटुंबातील एका व्यक्तीला जात प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्या आधारे त्याच कुटुंबातील त्याच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) अंशतः खरे आहे.

अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र महत्वाचा पुरावा मानून, इतर पुराव्यांची मागणी न करता सक्षम प्राधिकाऱ्याने जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत शासन अधिसूचना दिनांक २४/११/२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गटसचिवांच्या असहकार आंदोलनाबाबत

**(८) * ३८१६३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कार्यरत गटसचिवांच्या वेतनश्रेणी व त्यासाठी लागणाऱ्या निधीचा प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी सन १९६१ ते २००४ या कालावधीत विविध समित्या नेमण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समित्यांपैकी यशवंतराव गडाख यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सन २००४ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशी लागू केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही न झाल्याने मागील ७० ते ३० वर्षापासून नोकरी करणाऱ्या गटसचिवांनी असहकार आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यशवंतराव गडाख समितीने सूचविलेल्या शिफारसी अद्यापपर्यंत लागू न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि, गटसचिवांच्या विविध मागण्यांबाबतची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) व (५) गटसचिवांनी त्यांच्या समस्यांबाबत दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मंत्रालयात दिनांक ०५/०७/२०१७ रोजी मा.मंत्री (सहकार) व मा.अपर मुख्य सचिव (सहकार) यांचेसमवेत चर्चा होऊन गटसचिव यांना शासकीय सेवेत समाविष्ट करणे शक्य नसल्याचे तसेच त्यांच्या थकीत वेतन व

भत्त्याच्या अनुषंगाने गटसचिवांना सविस्तरपणे अवगत करण्यात आलेले आहे. सर्व विभागीय सहनिबंधक यांना त्यांच्यास्तरावर संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा देखरेख सहकारी संस्था व गटसचिव प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन उचित कार्यवाही करण्याच्या सूचना दिनांक ०७/०७/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत.

या व्यतिरिक्त राज्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी सभासदांना केलेल्या पीक कर्ज पुरवठ्याच्या प्रमाणात (०.५% ते १.५%) संस्थांच्या सक्षमीकरणासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत दिनांक ०६/०९/२०१४ व दिनांक ०२/०८/२०१७ चे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सदर योजनेंतर्गत पात्र संस्थांना त्यांच्या पीक कर्ज वाटपाच्या प्रमाणात जास्तीत जास्त रुपये १ लाख अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे. या अर्थसहाय्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज व कर्मचाऱ्यांचे वेतन इत्यादी खर्च भागविण्यास मदत होणार आहे.

-----------------

## राज्यात वीज निर्मितीसाठी लागणाऱ्या कोळशाचा योग्य पुरवठा न करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * ३९१३५ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्रीमती स्मिता वाघ, श्री.आनंद ठाकूर, श्री.विक्रम काळे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोळशापासून वीजनिर्मिती करणाऱ्या शासनाच्या महानिर्मिती उपक्रमाला दररोज सवा लाख मेट्रीक टन कोळशाची गरज असतानाही कोळसा पुरवठा कंपन्याकडून केवळ एक लाख मेट्रीक टन कोळसाच्या पुरवठा होत

असून तो कोळशा ४/५ दिवस पुरेल एवढाच असल्याने वीज निर्मिती कमी होऊन भारनियमन करावे लागत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे व्यापारी तत्वावर वीज विक्री करण्यासाठी उभारण्यात आलेल्या राज्यातील खाजगी कंपन्यांचे कोळशावर आधारित सुमारे ४३७० मेगावॅटचे औष्णिक वीज प्रकल्प बंद पडून रुपये २५ हजार ८०० कोटीची गुंतवणूक अडचणीत आल्याने तसेच भारनियमन टाळण्यासाठी कोळसा आयात करण्याची परवानगी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळशावरील वीज प्रकल्प पूर्ण क्षमतेने आणि योग्यरितीने चालविण्यासाठी २१ दिवसांचा साठा असणे आवश्यक असल्याने त्यादृष्टीने सदर कंपन्यांना शासनाने सहाय्य करणे आणि नियोजन न करता अपूरा कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपन्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) राज्यातील महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत केंद्रांना नियमित कोळसा पुरवठा होण्यासाठी, महानिर्मिती कंपनीने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कोल इंडिया लि. या कंपनीच्या उपकंपन्या WCL, MCL, SECL, आणि सिंगारेनी कोल कंपनी यांच्याशी दीर्घकालीन इंधन पुरवठा करार केलेले आहेत. कोळसा पुरवठा नियोजनासाठी महानिर्मितीकडून कोळसा कंपन्यांना प्रत्येक महिन्यासाठी कोळसा मागणी पत्र (order booking programme) दिले जाते.

औष्णिक विद्युत केंद्रातील कोळसा साठा व कोळसा पुरवठा वाढीसाठी कोळसा कंपन्या, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) नवी दिल्ली यांचेसोबत सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरु असून कोळसा साठयात हळूहळू सुधारणा होत आहे. तसेच केंद्र शासनाच्या अखत्यारीतील कोळसा कंपन्या व रेल्वे यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कोळसा रेक्सची संख्या वाढवून दिल्याने कोळसा पुरवठ्यामध्ये आणखी सुधारणा झाली आहे.

तसेच वीजनिर्मिती स्त्रोतांकडून येणारी वीज व मागणी लक्षात घेऊन महावितरण कंपनी वीज उपलब्धता व मागणी याची ताळमेळ घालते. त्यामुळे राज्यात जानेवारी, २०१८ मध्ये व तद्नंतर वीज निर्मिती कमी झाल्याच्या कारणास्तव कुठेही भारनियमन करण्यात आले नाही.

(२) महानिर्मितीचे विद्युत केंद्रांना लागणाऱ्या देशी कोळशाचा पुरवठा आणि आवश्यकता यामधील तूट भरून काढण्यासाठी कोळसा आयात करण्याच्या परवानगीसाठी महानिर्मितीने केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA), केंद्रीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार व राज्य शासन यांच्याशी पत्रव्यवहार केला असून त्याबाबत केंद्र शासनाच्या परवानगीच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया सुरु करण्याबाबत महानिर्मिती कंपनीस निर्देश देण्यात आले आहेत. केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) केंद्रीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून परवानगी मिळाल्यानंतर आयात कोळसा खरेदीबाबत अंतिम आदेश देण्यात येतील.

(३) कोळसा पुरवठा नियोजनासाठी महानिर्मितीकडून कोळसा कंपन्यांना प्रत्येक महिन्यासाठी कोळसा मागणी पत्र (order booking programme) दिले जाते. तसेच कोळसा पुरवठा सुधारणेसाठी, अध्यक्ष, कोल इंडिया लि., सदस्य (वाहतूक) रेल्वे, संचालक (पणन)-डब्लू.सी.एल. व कोल इंडिया लि., अतिरिक्त सचिव व सचिव केंद्रीय कोळसा मंत्रालय, केंद्रीय विद्युत प्राधिकरण - उपगट समिती तसेच मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र यांचेसोबत, केंद्रीय कोळसा मंत्रालय, कोल इंडिया लि., केंद्रीय विद्युत प्राधिकरण, रेल्वेज यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध बैठका घेण्यात आल्या त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे कोळशाच्या पुरवठयात सुधारणा झालेली आहे. कोळसा कंपन्यांनी निर्धारित कोळसा मात्रेपेक्षा कमी कोळसा पुरवठा केल्यास त्यांना त्या प्रमाणात दंड करण्याची तरतूद इंधन पुरवठा करारात आहे. त्यानुसार अपुरा कोळसा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली येथील शेतकऱ्यांना विक्री केलेल्या मालाची थकीत रक्कम अदा करण्याबाबत

**(१०) * ३९१८४ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथे कृषी उत्पादन बाजार समितीमध्ये खरेदी-विक्री संघाच्या माध्यमातून टक्केवारीवर नाफेडमार्फत माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१७ या कालावधीत तूर, उडीद, मूग, सोयाबीन या शेतीमालाची खरेदी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा शेतकऱ्यांना अद्याप सदर शेतमालाची थकित रक्कम मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) हंगाम २०१७-१८ मध्ये राज्यात किमान आधारभूत दराने मुग, उडीद व सोयाबीनची खरेदी करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीस बाजार समिती, हिंगोलीच्या आवारात दिनांक ४/१०/२०१७ पासून पणन महासंघाने नियुक्त केलेल्या हिंगोली तालुका खरेदी विक्री संघ मर्या. हिंगोली या संस्थेमार्फत खरेदी केंद्र सुरु करण्यात आले होते.

(२) व (३) होय.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेस्तरावर केलेल्या चौकशीमध्ये सबएजंट संस्थेने खरेदीचे दस्तऐवज ठेवले नसून शेतकऱ्यांच्या उत्पादनापेक्षा जास्त खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे. परंतू कागदपत्रांची छाननी केल्यानंतर तालुका खरेदी विक्री संघाने मुग खरेदी केलेल्या ४९ शेतकऱ्यांचे, उडीद खरेदी केलेल्या १४९ शेतकऱ्यांचे व सोयाबीन खरेदी केलेल्या ९ शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांचे चुकारे कागदपत्रांच्या छाननीनंतर अदा करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फुटून शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(११) * ३७९२१ ॲड.अनिल परब, श्री.प्रसाद लाड, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन आंबेत खाडी मार्गावर फुटल्याने प्रदूषित पाणी सावित्री नदीच्या पात्रात मिसळून कोंडीवते पासून गामेंडी पर्यंत व केम्बुर्ली पासून दाभोळ कोकरे पर्यंतच्या सुमारे १८ किमीच्या परिसरातील गावे बाधित झाली असल्याचे तसेच कोल परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात सदर सांडपाणी घुसल्यामुळे अनेक जमिनी नापिक झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त भागातील रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन जीर्ण झाल्याने अनेक ठिकाणी फुटून शेतांमध्ये सांडपाणी घुसून झालेल्या नुकसानीचे पंचनामे होत नसल्याने शेतकऱ्याना नुकसान भरपाई मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओवळे पासून अरबी समुद्रापर्यंत सांडपाण्याची पाईपलाईन नेण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून निधी अभावी त्यावर अमंलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रांताधिकारी, तहसिलदार व संबंधित पोलीस अधिकारी यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

दिनांक ०१/०४/२०१७ ते दिनांक ०५/०४/२०१७ या कालावधीमध्ये मौजे सव, गोठे, जुई व तुडील येथे तसेच दिनांक ११/०७/२०१७ ते दिनांक २१/०७/२०१७ रोजी मौजे सव गावाजवळ सांडपाणी वाहिनीच्या गळतीमुळे शेतामध्ये रासायनिक सांडपाणी गेले होते.

वरील घटनामध्ये झालेल्या सांडपाणी गळतीमुळे नुकसान भरपाई मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ०४/०१/२०१८ रोजीचे निवेदन महामंडळास प्राप्त झाले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सांडपाणी वाहिनी जुनी असून वाहिनीत एअर ट्रॅप होऊन गळतीच्या घटना घडल्या आहेत. त्याबाबत पंचनामे प्राप्त झाले होते. तथापि त्यामध्ये नुकसान भरपाईचा उल्लेख नसल्याने नुकसान भरपाई प्रमाणित करण्याबाबत महसूल विभाग व कृषी विभाग यांना कळविण्यात आलेले आहे. महामंडळास नुकसान भरपाईचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त होताच त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल

(३) हे खरे नाही.

सदर पाईपलाईन वाढविण्याबाबत राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार ओवळेपासून २.२ कि.मी. अंतरावर सांडपाणी सोडण्यासाठी खाडीतून पाईपलाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) हे खरे आहे.

दिनांक २१/१२/२०१७ रोजी प्रांताधिकारी महाड यांचे कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी बैठकीत प्रांताधिकारी, तहसिलदार व संबधित पोलीस यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीकडून कार्यवाही करण्याची मागणी केली होती.

(५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे सदर वाहिनीवरील एअर-व्हॉल्व मधून ज्यावेळी दुर्गंधीयुक्त रासायनिक सांडपाणी बाहेर पडल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी महामंडळाकडून तातडीने दुरुस्ती करुन सदर वाहिनी पुर्ववत करणेत आलेली आहे. तसेच सदर सांडपाण्याने बाधित

झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे पंचनामे महूसल व कृषी विभागाकडून व पुर्वीचे नुकसान भरपाई प्राप्त न झालेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव शिफारशीसह पाठविणेबाबत उपविभागीय अधिकारी, महाड यांना दिनांक २१/१२/२०१७ रोजी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारवी (ता.मुरबाड, जि.ठाणे) धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१२) * ३७९९९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारवी (ता.मुरबाड, जि.ठाणे) धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एकाला नोकरी व जमिनीचा योग्य मोबदला देणे इत्यादी आश्वासने पूर्ण न करणे तसेच नुकसान भरपाईच्या धनादेशावर अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नसल्याने बँकेने ते स्वीकारण्यास नकार दिला असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००४ च्या सर्वेक्षणानंतर पुनर्विसितांच्या घरांसाठी निश्चित करण्यात आलेले क्षेत्रफळ कमी केल्याने गावठाण २ मधील जागेत ८६ ऐवजी २०५ कुटुंबांचे पुनर्वसन केले जाणार असल्याने आदिवासींना मिळणाऱ्या घरांचे क्षेत्रफळ कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

बारवी धरणामुळे बाधित झालेल्या कुटुंबातील एका व्यक्तीस संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांच्या सेवेत विहित पद्धतीने सामावून घेणेबाबत नगरविकास विभागाकडून, दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांकडून प्राप्त झालेले सर्व मूळ अर्ज छाननी करुन त्याची अंतिम यादी करण्यासाठी महामंडळाने दिनांक ०५/०१/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेली आहे.

म.औ.वि.अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ मधील कलम ३३(२) अन्वये जमीन वाटाघाटीने संपादीत होऊन निवाडयाप्रमाणे रुपये ३,७५,०००/- प्रती हेक्टरी दराने रक्कम खातेदारांस पुर्वीच वाटप करण्यात आली आहे.

दिनांक ०१/९/२०१७ रोजी वाटप केलेल्या घरांच्या नुकसान भरपाईच्या धनादेशावर अनवधानाने स्वाक्षरी राहिल्याचे दिनांक ०४/०९/२०१७ च्या दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात बातमी आल्यानंतर निदर्शनास आले होते. त्यानुसार लगेच दिनांक ०५/९/२०१७ रोजी संबंधित प्रकल्पग्रस्तांना परिपुर्ण धनादेशाचे वाटप करण्यात आलेले आहे. कुठल्याही शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आलेली नाही.

(२) बारवी (धरणाची) उंची वाढविल्यामुळे विस्थापीत होणाऱ्या ६ गावे व ५ संलग्न पाडे यांच्या पुनर्वसनाकरीता महामंडळामार्फत (१) काचकोळी गावठाण-१ व २ (२) मानिवली गावठाण-१ व २ (३) कोळेवडखळ गावठाण-१ व २ (४) तोंडली गावठाण-१ व २ (५) मोहघर गावठाण-१ व २ असे १० गावठाणे नियोजित करण्यात आलेली असून ५ पेक्षा कमी सदस्य असलेल्या कुटुंबांस ३७०.०० चौ. मी. (B Type Plots Area) भूखंडाचे क्षेत्रफळ व ५ पेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबांस ७४०.०० चौ. मी. (A Type Plots Area) भूखंडाच्या क्षेत्रफळास मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर भूखंडाच्या क्षेत्रफळात कुठलाही बदल करून क्षेत्रफळ कमी केलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) लागू नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील सहाय्यक निबंधक यांच्याविरूध्द कार्यवाही करण्याबाबत

**(१३) * ३८४८३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक २४५०१ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील सहाय्यक निबंधक यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत मा.सहकार मंत्री यांनी सहकार आयुक्त, पुणे यांना सन २०१६-२०१७ मध्ये आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीत केलेल्या गैरवर्तणुकीवरून निवडणुक निर्णय अधिकारी, परभणी यांनी विभागीय सह निबंधक सह संस्था, औरंगाबाद यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करून दोषींविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची थोडक्यात माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) १) परभणी जिल्ह्यातील श्री.पांडुरंग शंकर राठोड, सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विशेष लेखा परिक्षक (फिरतेपथक) यांनी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही, चौकशी अहवालानुसार तक्रारदार यांचा तक्रार अर्ज जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, परभणी यांनी निकाली काढला असल्याचे त्यांच्या दिनांक १०/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

२) जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीत केलेल्या गैरवर्तणुकीवरून निवडणूक निर्णय अधिकारी, परभणी यांनी विभागीय सह निबंधक सह संस्था, औरंगाबाद यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित श्री.पांडुरंग शंकर राठोड यांना दिनांक २४/११/२०१६ च्या ज्ञापनान्वये सक्त ताकीद दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समाजकल्याण विभागाच्या पुणे शहर व जिल्हयातील ५ वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे जेवण ठेकेदाराने बंद केल्याबाबत

**(१४) * ३८८३९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील चांडौली, राजगुरु नगर येथील मुलीची निवासी शाळा, मुलांचे वसतिगृह, शिरुर येथील मुलाचे वसतिगृह तसेच येरवाडा येथील मुले व मुलीच्या वसतिगृहातील ठेकेदारांना त्यांची देयके न दिल्याने त्यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजीपासून जेवण देण्याचे बंद केले असल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत राज्यातील अनेक शाळांना पोषण आहाराचा निधी मिळाला नसल्याचे आणि शासनाकडून केवळ तांदुळाचा पुरवठा केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह चांडोली, ता.खेड, जि.पुणे या वसतिगृहाच्या भोजन पुरवठ्याची मुदत संपल्याने संबंधित पुरवठादाराने दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी भोजन पुरवठा केला नाही. त्यामुळे सदर वसतिगृहातील मुलांच्या भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

दिनांक १९/१२/२०१७ पासून सदर वसतिगृहाचा भोजन पुरवठा सुरळीत झाला असून, भोजन पुरवठ्याच्या नविन ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत या पुरवठादारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडवली-वावे या गावादरम्यानच्या उल्हास नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) * ३८६९३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवपुरी पॉवर हाऊस ते भिवपुरी रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मार्गात उल्हासनदीवर रेल्वे पुल उभारण्यात आला होता परंतु कालांतराने या रेल्वेमार्गाचा वापर टाटा पॉवर कंपनीने बंद केल्याने वडवली-वावे या गावातील लोकांची येण्या-जाण्याची समस्या लक्षात घेऊन उक्त कंपनीने या नदीवर असलेल्या रेल्वेलाईनवरून स्वखर्चाने पादचारी पुल बांधला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जत तालुक्यातील वडवली ते वावे या गावादरम्यान उल्हासनदीवर असलेल्या उक्त पुलाची पडझड झाल्याने नागरीकांना नदीतून अथवा लांबच्या पर्यायी रस्त्याने प्रवास करावा लागत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर पुलाच्या दुरूस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) भिवपुरी निर्मिती केंद्राच्या साहित्य व उपकरणाच्या वाहतुकीसाठी भिवपुरी पॉवर हाऊस ते भिवपुरी रेल्वे स्थानकापर्यंत सुमारे १९२० मध्ये बांधण्यात आलेला ट्रॉली ट्रॅक टाटा पॉवर कंपनीच्या मालकीचा आहे. सदर ट्रॉली ट्रॅक वडवली-वावे या गावाजवळील उल्हासनदीवरून जातो. त्याचबरोबर ट्रॉली ट्रॅकच्या बाजूला ट्रॉली ट्रॅकच्या देखभालीची व्यवस्था करण्यासाठी पादचारी पुल उल्हासनदीवर बांधण्यात आला होता.

(२) व (३) सदरचा पादचारी पुल टाटा पॉवर कंपनीच्या मालकीचा आहे. भिवपुरी पॉवर हाऊस ते भिवपुरी रेल्वे स्थानकापर्यंत असलेल्या टाटा पॉवर कंपनीच्या ट्रॉली ट्रॅकचे कामकाज गेल्या २० वर्षापासून बंद आहे. ट्रॉली ट्रॅकचे कामकाज बंद झाल्यामुळे टाटा पॉवर कंपनीचा पादचारी पुलाचा वापर करणे बंद झाले आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. १ कर्जत यांनी दिनांक १२/०२/२०१८ च्या पत्रान्वये सदर पुल दुरुस्ती करणेबाबत टाटा पॉवर कंपनीला कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात अनुशेष भरतीमध्ये मुकबधीर व्यक्तींची नियुक्ती करण्याबाबत

**(१६) * ३७७९१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील एकाही अनुशेष भरतीमध्ये मुकबधीरांना स्थान देण्यात आले नसल्याने अपंग व्यक्ती (समानसंधी) सहभाग व हक्काचे संरक्षण अधिनियम १९९५ नियमाची अंमलबजावणी करण्याबाबत मुक-बधीर असोशिएशन, कोल्हापूर यांनी जिल्हाधिकारी यांना अनेकदा निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) व (२) मुकबधीर व्यक्तींचा शासकीय सेवेतील अनुशेष भरणे तसेच त्यांच्या विविध मागण्यांबाबत मुक-बधीर असोसिएशन, कोल्हापूर या संघटनेमार्फत दिनांक ०८/०१/२०१८ रोजी तसेच त्यापुर्वी देखील जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना निवेदन देण्यात आलेले आहेत.

उक्त निवेदनात करण्यात आलेल्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सी.पी.आर. रुग्णालय व प्रादेशिक परिवहन कार्यालय यांना त्यांच्या कार्यालयाशी निगडीत मुद्दयाबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून सूचित करण्यात आले आहे.

अपंग कल्याणशी संबंधित विविध मागण्यांच्या अनुषंगाने या पुर्वी शासन स्तरावर वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. या बैठकामध्ये उपरोक्त संघटनेच्या निवेदनातील मुद्यांबाबत देखील चर्चा करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर बैठकीतील निर्देशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित विभागांना सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली औद्योगिक परिसरातील पाणी चोरी रोखण्याबाबत

**(१७) * ३८०१९ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली औद्योगिक परिसरातील वाढत्या पाणी चोरीबाबत डोंबिवली वेलफेअर असोसिएशनचे सचिव, राजू नलावडे यांनी दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही दिनांक २७ मार्च, २०१६ रोजी अश्याच प्रकारची तक्रार दिल्यानंतर विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१६ मध्ये सदर वाहिन्यांच्या रक्षणासाठी सुरक्षारक्षक नेमण्याचा निर्णय शासनाने घोषित केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाची शासनाने अंमलबजावणी केली आहे काय, तसेच अद्यापही पाणीचोरी होत असल्याने या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

श्री.नलावडे यांनी दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कल्याण शिळ रोड वरील पाईपलाईनच्या Expansion Joints मधून गळती होत असल्याची तक्रार केली होती, त्यानुषंगाने वेळोवळी दुरुस्ती करुन गळती बंद केलेली आहे व सद्य:स्थितीत त्यातून कुठल्याही प्रकारची गळती होत नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

श्री.नलावडे यांनी त्यांच्या दिनांक २७ मार्च, २०१६ च्या पत्रामध्ये Expansion Joints मधून होणाऱ्या गळतीबाबत तक्रार दिली होती.

अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१६ मध्ये विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्रमांक २५ बाबत मा.मंत्री उद्योग यांनी केलेल्या निवेदनात काटई ते बदलापूर रस्त्यावरील पाईपलाईनवर होत असलेल्या अनधिकृत नळ जोडण्या न होण्यासाठी सदर जल वाहिन्यांसाठी सेक्युरिटी एजन्सी म्हणून महाराष्ट्र सेक्युरिटी कॉर्पोरेशन यांची निवड करण्यात आल्याचे नमूद केले होते. त्यास अनुसरुन महामंडळातर्फे बारवी पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा बलाचे सुरक्षारक्षक दिनांक २६/०४/२०१६ पासून नेमण्यात आले आहेत.

(३) होय.

तसेच बारवी पाणीपुरवठा योजनेच्या कटाई ते बदलापूर रस्त्यावरील पाईपलाईनवर माहे मार्च, २०१६ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत एकूण ८२८ अनधिकृत नळजोडण्या निष्कासित करण्यात आल्या. अनधिकृत नळ जोडण्या आढळून आल्यास त्या ताबडतोब बंद करण्याचे काम प्राधान्याने करण्यात येऊन पाणी गळती बंद करण्यात येते. तसेच सद्य:स्थितीत अनधिकृत नळजोडण्या निष्कासित करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सहकारी संस्थेच्या दफ्तर हस्तांतर करण्यास झालेला विलंब

**(१८) * ३८३११ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचरा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील श्रीदेव रामेश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. या संस्थेच्या माजी सचिवांनी संस्थेचे दफ्तर अनधिकृतरित्या स्वत:कडेच ठेवून दिनांक २ एप्रिल, २०१५ मध्ये नियुक्त केलेल्या नविन संचालक मंडळांस कामकाजात सहकार्य न करता त्यांची अडवणूक करुन कामात व्यत्यय आणत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जमाफीसाठीच्या पडताळीणीसाठी दफ्तर उपलब्ध करुन देण्यात विद्यमान संस्था चालक असमर्थ ठरल्याने संस्थेचे ४४९ सभासद छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना २०१७ च्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आचरा पोलीस ठाण्यात माजी सचिवांची तक्रार नोंदवूनही कारवाईस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नूसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय. संस्थेने अशी तक्रार दिनांक ०३/०७/२०१६ च्या अर्जान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालवण यांच्या कार्यालयास केली आहे.

(२) हे खरे नाही.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या अनुषंगाने संस्थेने तयार केलेली ४४९ लाभार्थ्यांपैकी दिनांक ०८/०२/२०१८ पर्यंत ३८८ लाभार्थींना रुपये ७३.४४ लाख एवढ्या कर्जमाफी व प्रोत्साहनपर रक्कमेचा लाभ देण्यात आलेला आहे.

(३) व (४) संबंधित संस्थेने दिनांक २४/१०/२०१७ रोजी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता. पोलीस ठाणे, आचरा येथे संस्थेचे माजी सचिव श्री.जितेंद्र पांगे यांच्याविरूध्द दिनांक १४/११/२०१७ रोजी FIR क्र. ००५५ नोंद करुन घेतला आहे. पोलीस ठाणे, आचरा यांच्याकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या “अ” श्रेणीतील शाळा व कर्मशाळांना अनुदान देण्याबाबत

**(१९) * ३८०४९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या अपंग कल्याण आयुक्तालयाद्वारे “अ” श्रेणीतील १२३ शाळा व कर्मशाळांना शंभर टक्के अनुदान देण्याचा अध्यादेश दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षाचा कालावधी होऊनही सदर अध्यादेशाची अंमलबजावणी न झाल्याने शाळा व कर्मशाळा कर्मचारी अद्‌याप लाभापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या लाभापासून वंचित ठेवणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना त्यांचे लाभ कधीपर्यंत देण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) शासन मान्य खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या "अ" श्रेणीतील १२३ विनाअनुदान तत्वावरील अपंगाच्या विशेष निवासी /अनिवासी शाळा व कर्मशाळांना अटीशर्ती तसेच तपासणीच्या अधीन राहून अनुदान देण्यास मंजूरीचा शासन निर्णय दिनांक ०८/०४/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे.

(२), (३) व (४) उपरोक्त शाळा/कर्मशाळांची तपासणी करुन त्यापैकी ६० संस्थाना संपूर्ण अनुदान आणि ६० संस्थांना ६ महिन्यात त्रुटी पूर्ण करण्याच्या अटींच्या अधीन राहून ५० टक्के अनुदान देण्यास पात्र ठरविण्यात आले. तसेच सदर १२० संस्थांना परिपोषण आणि जागेभाडे प्रतिपूर्ती अदा करण्यास मान्यता देण्याचा शासन निर्णय दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. अनुदानासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान देण्यासाठी पदनिर्मिती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्य योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ३७६७२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्य योजनेंतर्गत ३७२ नोंदणीकृत संस्थांना केलेल्या भागभांडवल आणि कर्ज वाटपात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) दोषी संस्थांवर सहकार विभागामार्फत फौजदारी/प्रशासकिय कारवाई सुरू असून सामाजिक न्याय विभागामार्फत दोषी आढळून आलेल्या ५ संस्थांवर गुन्हयाची नोंद करण्यात आलेली आहे.

-----------------

## परभणी व हिंगोली जिल्हयात मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीत झालेला गैरव्यवहार

**(२१) * ३८२०७ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी व हिंगोली जिल्हयात केंद्र शासनाच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीमध्ये ८३ महाविद्यालयांनी रुपये सव्वाचार कोटीचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करून गैरव्यवहार झालेली रक्कम निश्चित करण्यासाठी प्रकल्पस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने अद्यापपर्यंत १७ महाविद्यालयांतील कागदपत्रांची तपासणी करून एकूण रुपये १४.१४ लक्ष इतकी गैरव्यवहाराची रक्कम निश्चित केलेली असून त्यापैकी रुपये ८.०५ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

उर्वरीत ६६ महाविद्यालयांकडील कागदपत्रांची पडताळणी करण्याची कार्यवाही प्रकल्पस्तरीय समितीकडून करण्यात येत असून त्यानुसार रक्कम निश्चित करण्याची कार्यवाही सूरू आहे.

-----------------

## राज्यातील रेशीम शेती आणि व्यापार वाढीबाबत

**(२२) * ३८०२५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९२२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक राज्यातील रामनगरम येथील रेशीमकोश बाजारपेठच्या धर्तीवर राज्यात जालना येथे खुली रेशीमकोश विक्री बाजारपेठ उभारणीची कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील रेशीम कोश उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडून फसवणूक होऊ नये म्हणून आधारभूत किंमतीने शासनस्तरावरून कोष खरेदी सुरु करून इतर राज्याच्या धर्तीवर प्रती किलो किमान रुपये ५० प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या गट शेतीप्रमाणेच मनरेगांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना लाभ देणे आणि रेशीम शेती आणि व्यापाराच्या वाढीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय. राज्यात जालना येथे खुली कोष विक्री बाजारपेठ उभारणीची कार्यवाही सुरु असून दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ च्या कृषि विभागाच्या शासन निर्णयान्वये संचालक (रेशीम) यांना जालना येथील कोष मार्केट करीता ४.०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

(२) प्रस्तुत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून जालना कोष खरेदी विक्री बाजारपेठ कार्यान्वित झाल्यानंतर त्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.
(३) मनरेगा योजना वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी आहे.

त्याअनुषंगाने महारेशीम अभियान-२०१८ राबविण्यात आले असून त्यामध्ये १८७३५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. सीडीपी कोषोत्तर प्रकिया योजनेअंतर्गत तीन ARM (Automatic Reeling Machine) केंद्र क्षेत्र योजने अंतर्गत भंडारा, जालना व सांगली येथे मंजूर केले असून त्यांचे उभारणीचे काम सुरु आहे. तसेच राज्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १२ MRM (Multiend Reeling Machine) खाजगी लाभार्थ्यांना दिले आहेत. तसेच राज्यात १५ शासकीय रिलींग युनिट पैकी ०७ रिलींग युनिट भाडेतत्वावर चालविणेस खाजगी व्यक्तींना दिलेले आहे.तसेच जालना व सोलापूर येथे बाजारपेठ उभारणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या इमारतींची बांधकामे प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * ३८९९४ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३६३३३ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार प्रकल्पांतर्गत अनेक आश्रमशाळा इमारतीची बांधकामे मागील ५ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांतर्गत सुर्यमाळ (ता.मोखाडा) व पळसुंडा या आश्रमशाळा इमारतीची बांधकामे अत्यंत धिम्यागतीने सुरु असल्याने सदरहू आश्रम शाळेतील विद्‌यार्थी गुरांच्या गोठयात राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शाळांची प्रलंबित बांधकामे पुर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) पालघर जिल्ह्यातील जव्हार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत १३ आश्रमशाळांच्या बांधकामास मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ६ आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या वापरात आहेत. उर्वरित ७ इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(२) व (३) जव्हार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत सुर्यमाळ व पळसुंडा या आश्रमशाळांच्या नवीन इमारत बांधकामास मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी सुर्यमाळ आश्रमशाळेच्या बांधकाम ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण न केल्याने त्यास कामाची मुदत संपल्यापासून प्रति दिवस रुपये १,०००/- दंड आकारण्यात येत आहे. ठेकेदाराने माहे मार्च, २०१८ पर्यंत काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. तसेच पळसुंडा आश्रमशाळेचे इमारतीचे काम प्रगतीपथावर असून त्यापैकी वसतिगृहाचे स्थापत्य काम पूर्ण झाले असून विद्युत पुरवठयाची कामे प्रगतीपथावर आहेत. सुर्यमाळ व पळसुंडा या दोनही आश्रमशाळा सद्य:स्थितीत जुन्या इमारतीत सुरु असून आश्रमशाळेतील जुने शेड दुरुस्ती करण्यात आली आहे ते विद्यार्थ्यांच्या राहण्यासाठी सुस्थितीत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अपंगत्वाचे खोटे दाखले सादर करुन शासकीय व निमशासकीय सेवेत नियुक्त्या केल्याबाबत

**(२४) * ३८२५२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अपंगत्वाचे खोटे दाखले देवून वर्ग अ ते ड या पदांवर दिव्यांगासाठी (अपंगासाठी) राखीव असलेल्या जागेवर खुल्या प्रवर्गातील व्यक्तींच्या शासकीय व निमशासकीय सेवेत नियुक्त्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्ज करते वेळी दिलेल्या अपंगत्वाच्या दाखल्याची खातरजमा शासनाकडून केली जात नसल्यामुळे उच्चस्तरिय अधिकारी खोटे प्रमाणपत्र सादर करुन दिव्यांगासाठी (अपंगासाठी) राखीव जागी आपल्या मर्जीतील किंवा नात्यातील लोकांची नियुक्ती करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गृहाघर तालुका अपंग पुनर्वसन संस्थेने जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ.प्रल्हाद देवकर यांच्याकडे तक्रार केली असून पदावर कार्यरत असलेल्या दिव्यागांची फेर तपासणी करणे, तफावत आढळलेल्या व्यक्तिंना अपात्र ठरवणे तसेच वेतन, भत्ते व विशेष आर्थिक लाभ घेणाऱ्यांना नोकरीतून बडतर्फ करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही,
(३) होय, हे खरे आहे.

जिल्हा शल्यचिकीत्सक, रत्नागिरी यांना निवेदन प्राप्त झाले आहे.
(४) जिल्हा शल्यचिकीत्सक, रत्नागिरी यांच्यामार्फत जिल्हा शासकीय रुग्णालय आणि उपजिल्हा तसेच ग्रामिण रुग्णालयामधील सर्व शासकीय पदावर कार्यरत असणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची ऑनलाईन प्रणालीद्वारे फेर तपासणी प्रक्रीया चालू आहे.

अपंग कल्याणशी संबंधित विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासनस्तरावर वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकामध्ये शासकीय सेवेत नियुक्त होणाऱ्या तसेच नियुक्त झालेल्या अपंग कर्मचाऱ्यांच्या अपंगत्व प्रमाणपत्राच्या तपासणीबाबत देखील चर्चा करण्यात आली. त्यानुसार बैठकीतील निर्देशाप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती आदिवासी विकास व शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षण शिबिरातील गैरसोईबाबत

**(२५) * ३८३५२ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती आदिवासी विकास व शिक्षण विभागांतर्गत आश्रमशाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सेवांतर्गत प्रशिक्षणातील शिबिरात निकृष्ठ भोजन व अनेक सुविधांचा अभाव असल्याची तक्रार आदिवासी विभागाकडे केली असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षणाच्या व्यवस्थापनाचे कंत्राट देण्यात आल्याने त्यात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) व (२) अध्यक्ष, शिक्षण संघर्ष संघटना, अमरावती यांचेकडून दिनांक ०७/११/२०१७ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद यांचेकडून खुलासा घेतला असून त्यानुसार संदर्भिय प्रशिक्षणातील सुविधांचा दर्जा समाधानकारक असून प्रशिक्षण व्यवस्थापनाच्या कंत्राट देण्यात गैरव्यवहार झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली येथील समाजकल्याण विभागाला प्राप्त निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२६) * ३८५८० श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील समाजकल्याण विभागाला जिल्हा नियोजन विकास आराखडयानुसार मिळालेल्या रुपये ५९ कोटींपैकी चालू आर्थिक वर्षात केवळ रुपये १६ कोटी इतकीच रक्कम खर्च झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयामध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे समाजकल्याण विभागाचा प्राप्त निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी विकास विभागात झालेल्या गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२७) * ३८६०१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७२३ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागाकडून मेणाच्या विविध योजनांमध्ये कोटयवधी रुपयांच्या गैरव्यवहारासंदर्भात कार्यवाही करणे तसेच भविष्यातील उपाययोजनांबाबत श्री.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली पुर्णवेळ समिती गठीत करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालानुसार या प्रकरणातील दोषींविरुध्द कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) ते (३) मा.न्या.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाची छाननी करुन, शासनामार्फत करावयाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्याकरीता श्री.पी.डी. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये पूर्णवेळ एक सदस्यीय समिती गठित करण्यात आलेली आहे.

करंदीकर समितीने आपला अहवाल अद्‌याप शासनास सादर केलेला नाही. करंदीकर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## लातूर येथील सोयाबीन खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबत

**(२८) * ३८०४७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील शासनाच्या सोयाबीन खरेदी केंद्रावर ग्रेडरकडून नाकारण्यात आलेल्या सोयाबीनच्या काही मालापैकी मा.सहकार मंत्री यांनी पुन्हा मशीनवर मोजणी केली असता तो योग्य असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाच प्रकारे राज्यातील इतर सोयाबीन केंद्रावर शेतकऱ्यांची ठेकेदार कंपन्यांकडून होणारी फसवणूक थांबविण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

लातूर येथे दिनांक १२/१०/२०१७ रोजी सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यात आले होते. श्री.तोडकर रामचंद्र रंगनाथ, रा.बाभलगांव, जि.लातूर या शेतकऱ्यांने दिनांक २५/११/२०१७ रोजी सोयाबीन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणलेले होते. त्यावेळी त्यामालाची आर्द्रता १४.५% असल्याने, (विहीत मर्यादा १२% पेक्षा जास्त) त्या शेतकऱ्याचा माल स्विकारला नव्हता. तथापि, सदर माल केंद्रावरच ठेवण्यात आला होता. लातूर येथील सोयाबीन खरेदी केंद्रावर मा.मंत्री(पणन) यांनी दिनांक ०८/१२/२०१७ रोजी भेट दिली,त्यावेळी श्री.तोडकर यांच्या मालाच्या आर्द्रता तपासली असता, आर्द्रता १२% आढळून आली. त्यानंतर दिनांक १३/१२/२०१७ रोजी संबंधित शेतकऱ्यांकडून ३२ क्विंटल सोयाबीन खरेदी करुन, शेतकऱ्याला चेकद्वारे रक्कम अदा केलेली आहे.
(२) सोयाबीनची हमीभावाने खरेदी “नाफेड” च्यावतीने केल्यामुळे, नाफेडने निश्चित केलेल्या Fair Average Quality (FAQ) दर्जाचा शेतमाल असल्याचे सिध्द झाल्यानंतर खरेदी करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बियर बार आणि दारु विक्री केंद्राना महापुरुष, गडकिल्ले व महिलांची नांवे देण्यास प्रतिबंध करण्याबाबत

**(२९) * ३८४४१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५००८ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बियरबार आणि दारु विक्री केंद्राना महापुरुष, देव-देवता, गडकिल्ले व महिलांची नावे देण्यास प्रतिबंध करण्यासाठी कार्यवाही सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अदयापपर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे. परंतु त्यामध्ये देव देवता व महिलांच्या नावाचा समावेश नाही.

(२) राज्यातील बियर बार आणि दारू विक्री केंद्रांना महापुरूष व गडकिल्ले यांची नावे देण्यास प्रतिबंध करण्याबाबतच्या अधिसूचनेचे प्रारूप विधी व न्याय विभागाच्या अभिप्राय व सहमतीकरिता सादर केलेले आहे.

त्याच प्रमाणे राज्यातील बियर बार आणि दारू विक्री केंद्रांना देव देवता यांची नावे देण्यास प्रतिबंध करता येतील किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांना कृषीपंप वीज जोडण्या देण्याबाबत

**(३०) * ३८५२० श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील बामणी फाटा, मनाठा-करमोडी ३, चिंचगव्हाण २ व शिवदरा येथील एका शेतकऱ्याने महावितरण कंपनीकडे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ व इतर शेतकऱ्यांनी दिनांक ११ जुलै, २०१४ रोजी कृषीपंप वीज

जोडणीसाठी रुपये ५ हजार २०० इतकी रक्कम भरुनही अदयाप वीज जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषीपंपाच्या वीज जोडण्या न दिलेल्या शेतकऱ्यांना महावितरणकडून रुपये ५० ते १० हजारांची वीज देयके देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना विदयुत जोडण्या देणे तसेच बेकायदेशीरपणे वीज देयके देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर शेतकऱ्यांना "महावितरण आपल्या दारी" या योजनेअंतर्गत केबलद्वारे वीज जोडणी देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
सदर ग्राहकांना उपरोक्त योजनेतंर्गत केबलद्वारे वीज जोडणी देण्यात आल्यामुळे त्याची देयके देण्यात आली आहेत.
(३) राज्यात "महावितरण आपल्या दारी" या योजनेअंतर्गत केबलद्वारे विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या एकूण १२९६५४ कृषीपंपांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणेकरिता एकूण रुपये १२५८.६७ कोटींची योजना महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित असून त्यामध्ये नांदेड जिल्हयातील १०३८१ कृषीपंप जोडणीकरिता रुपये १००.७८ कोटी इतक्या निधीचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याबाबत

**(३१) * ३८०६५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७१८ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील कर्जमाफी योजनेंतर्गत कर्जमाफीसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची प्रकिया मागील दोन महिन्यांपासून सुरु असूनही जिल्ह्यातील १ लाख, ९१ हजार, १८७ पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांपैकी ९० हजार १९१ शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत तसेच पात्र सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची प्रकिया कधीपर्यंत पूर्ण होणार आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत अकोला जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांच्या ९७,३१८ खात्यांवर एकूण रुपये ४०५.८३ कोटी कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभापोटी जमा करण्यात आले आहेत. उर्वरीत पात्र लाभार्थींना लाभ देण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील विद्युत पोल आणि तारांच्या दुरुस्तीबाबत

**(३२) * ३९२८९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३६२०० ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील साखरे व इतर अनेक गावातील विद्युत पोल आणि लोंबकळणाऱ्या तारांच्या दुरुस्तीकडे महावितरणाकडून दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार मुरबाड तालुक्यातील वाकलेले विद्युत पोल व लोंबकळणाऱ्या विद्युत तारांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मुरबाड तालुक्यातील सरळगाव हद्दीतील साखरे या गावाची दिनांक १९/०१/२०१८ रोजीच्या लोकमत वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातमीच्या आधारे तेथील कनिष्ठ अभियंता व उपकार्यकारी अभियंता यांनी पाहणी केली असता सदर ठिकाणी लघुदाब वाहिनीचा पोल वाकलेल्या स्थितीत आढळला.
(२) मुरबाड तालुक्यातील जीर्ण विद्युत पोल व वाहिनी बदली करण्याचे अंदाज पत्रक तयार करुन जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना व पंडित दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच सदर कामांची निविदा काढून त्यांचे कार्यादेश कंत्राटदारांना देण्यात आले आहे. त्यापैकी दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत कार्यादेश देण्यात आलेल्या कंत्राटदाराची कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने त्याला महावितरण कंपनीकडून कंत्राट रद्द करण्यासाठीची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. परंतु सद्य:स्थितीत सदर कंत्राटदाराला नेमून दिलेले काम समाधानकारकरित्या सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या रक्कमेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * ३९५६६ श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९६८ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या रक्कमेत झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीसंदर्भात नेमलेल्या पथकाने (एसआयटी) चौकशी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार गैरव्यवहाराची एकूण रक्कम किती आहे व संबंधित दोषीविरुध्द केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणी चौकशी पथकाने (एसआयटी) केलेली चौकशी मान्य नसल्याने अहवालाच्या आधारे पुन्हा स्वतंत्र चौकशी करण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार पुन्हा चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विशेष चौकशी पथकाने मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत गैरव्यवहार प्रकरणी चौकशी अहवाल सादर केला असून, त्यामध्ये दर्शविलेली गैरव्यवहाराची रक्कम रुपये १८२६.८७ कोटी इतकी आहे. सदर अहवालाची पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण यांचेस्तरावर सुरु आहे.
(३) नाही, विशेष चौकशी पथकाच्या चौकशी अहवालाची पडताळणी आयुक्त, समाजकल्याण यांचे स्तरावर सुरु असून पथकाने दर्शविलेल्या अनियमिततेच्या रुपये १८२६.८७ कोटी रक्कमेपैकी रुपये १०५७.७६ कोटी रकमेची अनियमितता असुन त्यापैकी रुपये ६३१.२१ कोटी रकमेचे समायोजन झालेले आहे, रुपये ९५.४७ कोटी इतकी रक्कम वसूल करुन कोषागारात भरणा केली आहे आणि उर्वरित रुपये २३१.०८ कोटी रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील कर्जमाफीसाठी पात्र शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्याबाबत

**(३४) * ३९९१४ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफीसाठी पात्र ग्रीन यादीतील शेतकऱ्यांना रक्कम अदा न केल्याने रुपये २५० कोटी राष्ट्रीय व जिल्हा बँकेत पडून असल्यामुळे ते परत करण्याच्या सूचना शासनाने दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जमाफीसाठी पात्र शेतकऱ्यांना रक्कम अदा न करणाऱ्या जिल्हा व राष्ट्रीय बँकांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर बँकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे. ग्रीन लिस्टमधील ज्या खात्याची माहिती, बँकेच्या दप्तराप्रमाणे जुळली नाही अशा काही बँकांना खातेदारांच्या रक्कमा खात्यावर जमा करता येत नसल्याने अशा रक्कमा परत करण्याबाबत व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये वेळोवेळी बँकांना सूचना दिल्या आहेत.

(२) याबाबतीत वेळोवेळी आढावा घेण्यात येवून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर बँकांमार्फत रक्कमा जमा करण्यात येत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‍भवत नाही.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील पाचही बाजारपेठांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) * ४००५० श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील पाचही बाजारपेठांमध्ये सोयीसुविधा नसल्याने माथाडी नेत्यांनी दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रशासक, कृषी मूल्य आयोग आणि अतिरिक्त आयुक्त यांच्या दालनात माती तसेच रस्त्यावर सडलेले बटाटे फेकून संताप व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी संबंधिताची चौकशी बाजार समिती करीत आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्त युवकांना वीज महानिर्मिती कंपनीमध्ये नोकरी देण्याबाबत

**(३६) * ४०१३९ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्त युवकांना महानिर्मिती कंपनीमध्ये नोकरी देण्याबाबत शासनाकडून विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील बेरोजगार प्रकल्पबाधित युवकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याने याबाबत निर्णय घेऊन महानिर्मिती कंपनीत प्रकल्पबाधित युवकांना सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सातारा जिल्ह्यातील कोयना धरणासाठी लागणारी जमीन जलसंपदा विभागाने संपादित केली आहे. सदर धरणावरील जलविद्युत केंद्राची उभारणी जलसंपदा विभागाने केलेली असून ते महानिर्मिती कंपनीकडून केवळ भाडेतत्वावर चालविण्यात येते. त्यामुळे महानिर्मिती कंपनीच्या धोरणानुसार सदर प्रकल्पग्रस्तांना महानिर्मिती कंपनीमध्ये सामावून घेता येणार नाही.

-----------------

## डोंगरे, चिखलडोंगरे व बोळींज (ता.वसई, जि.पालघर) येथील विद्युत उपकेंद्र बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * ४०१५६ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगरे, चिखलडोंगरे व बोळींज (ता.वसई, जि.पालघर) येथील सव्वा पाचशे एकर जागेवर बांधण्यात येणाऱ्या ८० गृहप्रकल्पासाठी २२/२२ के.व्ही.ए. सबस्टेशनास मंजूरी मिळाली असताना आदेशात नमूद केल्याप्रमाणे हे सबस्टेशन ३ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याऐवजी प्रत्यक्षात दुसऱ्या गृहप्रकल्पाच्या सबस्टेशनमधून वीज पुरवठा करून महावितरणाचे कंत्राटकर व संबंधित बांधकाम व्यावसायिक यांनी कोटयवधीचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातील मे.पुनम मेगा डेव्हलपर्स व मे.भूमी आर्केड या इमारतीच्या कॉमन (लिफ्ट/वाटर पंप) कनेक्शनकरिता वीजजोडणीची मंजूरी उपविभागीय कार्यालयास देण्यात आली असताना देखील अतिरिक्त कार्यकारी

अभियंता, विरार यांच्याकडून अनधिकृतपणे एकूण १०२८ घरगुती व व्यावसायिक सिंगल फेज वीज जोडणी देण्यासाठी ४ इनडोअर ट्रान्सफॉर्मर लावण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच महावितरणसह ७८ बांधकाम व्यावसायिकांचाही यामध्ये समावेश असून सदर जागेवर विद्युत उपकेंद्राऐवजी दोन मजली इमारत बांधून बेकायदा बांधकाम केल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) ४x६३० केव्हीए रोहित्रांना तात्पुरत्या स्वरुपात २२ केव्ही वाय के नगर या वाहिनीवरुन वीज पुरवठा देण्यासाठी मुख्य अभियंता, महावितरण कल्याण परिमंडळ यांनी त्यांच्या दिनांक ०५/०८/२०१६ पत्रान्वये मजूंरी दिली आहे. मे.पूनम मेगा डेव्हलपर्स व मे.भूमी आर्केड या इमारतीच्या कॉमन (लिफ्ट/ वॉटर पंप) कनेक्शन विभागीय कार्यालयातून मंजूर करण्यात आले आहे व रोहित्रांवरील वीज ग्राहकांना वीज मागणीप्रमाणे वीज कनेक्शन देण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.

चिखलडोंगरे व बोळींज या ठिकाणी उभ्या होत असलेल्या गृहप्रकल्पासाठी विद्युत जोडणी देण्याकरिता स्वतंत्र इनडोअर स्विचिंग स्टेशन उभारण्याकरीता मुख्य अभियंता, महावितरण कल्याण परिमंडळ यांनी मंजुरी दिली असून त्यानुसार त्याठिकाणी इनडोअर स्विचिंग स्टेशनच्या कंट्रोल युनिटची उभारणीची कामे पूर्ण झालेली आहेत. सदर स्विचिंग इनडोअर असल्याकारणाने त्याठिकाणी भूमिगत उच्चदाब केबल, कंट्रोल पॅनल व इतर विद्युत उपकरणे यांच्या एकत्रिकरणासाठी व नियंत्रणासाठी इमारत बांधण्यात आलेली आहे. सदर इमारत ही २२/२२ के.व्ही. इनडोअर स्विचिंग स्टेशनसाठीची कंट्रोल रुम असून त्याचा वापर इतर कोणत्याही कारणासाठी करण्यात आलेला नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मराठा तरुणांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) * ४०२०७ श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाच्या बेरोजगारांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातुन राष्ट्रीयकृत व नागरी सहकारी बँकांमार्फत रुपये २ हजार कोटीचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देणार असल्याची माहिती मा.सहकार मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात दिली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रति लाभार्थी रुपये १० ते ५० लाख बिनव्याजी कर्ज देण्यात येणार असून त्यासाठी शासनाने काही अटी व नियम लागू केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्ज देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) अंशत: खरे आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा बेरोजगार तरुणांना राष्ट्रीयकृत व नागरी सहकारी बँकांमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्याची घोषणा मा.मंत्री (सहकार) यांनी केली आहे. मात्र रक्कमेचा उल्लेख केलेला नाही.

(२) व (३) राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असणाऱ्या तरुण वर्गाला आर्थिक सहाय्य पुरविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागाच्या अखत्यारीतील अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज प्रकल्प योजना या ३ योजना राबविण्यास दिनांक २१/११/२०१७

रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये पात्र लाभार्थ्यांच्या अटी व शर्ती ठरवून देण्यात आलेल्या असून त्याप्रमाणे कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पाचगणी येथील शॉलम इंग्लिश स्कूलमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३९) * ४०२२४ श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरजू आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत पाचगणी येथील शॉलम इंग्लिश स्कूलमध्ये पाठविलेल्या मणिपूर गंजाड (ता.डहाणू, जि.पालघर) येथील राकेश रामा भावार, वय वर्षे ९ या विद्यार्थ्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्याच्या पालकांना शाळा प्रशासनाने मुलगा आजारी असल्याचे कारण देत मृतदेह त्यांच्या ताब्यात दिला, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, शाळा व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे सदर विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असल्याने उक्त प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मृत विद्यार्थ्याच्या पालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) आजारपणामुळे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचा मृतदेह त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आला, हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

कै.राकेश भवर यास दिनांक ०९/०१/२०१८ रोजी ताप आल्याकारणाने त्यास ग्रामीण रूग्णालय, पाचगणी येथे उपचार करण्यात आल्यानंतर शाळेवर परत सोडण्यात आले होते. दिनांक १०/०१/२०१८ रोजी पुन्हा ताप आल्याने त्यास खाजगी दवाखान्यात नेऊन उपचार करण्यात आले.

दिनांक ११/०१/२०१८ रोजी सदर शाळेच्या मेटरन यांना सकाळी ६.३० वाजता सदर विद्यार्थी बेशुद्ध अवस्थेत आढळल्याने त्यास प्रथम खाजगी रूग्णालयात आणि नंतर ग्रामीण रूग्णालय, वाई येथे नेण्यात आले. तथापि, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सदर विद्यार्थ्याचा मृत्यू सकाळी ८.०० ते ८.१५ या दरम्यान झाल्याचे घोषित केले. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या पत्रान्वये सदर विद्यार्थ्याचा मृत्यू Cardiogenic shock due to cardiac tamponade या कारणामुळे झाला असल्याचे कळविले आहे.

सदर विद्यार्थ्याच्या पोस्ट मॉर्टम अहवालाची प्रत जिल्हा शल्यचिकीत्सक, ससून रूग्णालय, पुणे यांना पाठविण्यात आली असून सदर अहवालाची पुन्हा तपासणी करून याबाबत अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील सहकारी जिनिंग प्रेसिंगची जागा निम्या किंमतीत विकल्याबाबत

**(४०) * ३७७१७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथील सहकारी जिनिंग प्रेसिंगची किंमत रुपये २४ कोटी इतकी असून ती अर्ध्या किंमतीत विकण्याचा निर्णय जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेतील लिलाव-टेंडर प्रकिया छुप्या मार्गाने केल्यामुळे केवळ तीनच निविदा प्राप्त झाल्यामुळे जिल्हा बँकेचा राजकीय व प्रशासकीय कारभार संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) नाही.
(२) नाही.
(३) या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल दिनांक २४/११/२०१७ व दिनांक १३/१२/२०१७ नुसार विभागीय सहनिबंधकांना सादर केला आहे. त्यामध्ये बँकेने जिनिंग संस्थेची स्थावर मालमत्ता वाजवी मुल्यांकनापेक्षा कमी किंमतीत विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे. बँकेने सरफेशी ॲक्ट २००२ मधील तरतूदीनुसार जिनिंग संस्थेची स्थावर मालमत्ता विक्रीची कार्यवाही केली आहे. सरफेशी कायद्यांतर्गत सहकार विभागास कारवाईचे अधिकार नाहीत आणि मालमत्ता विक्री संबंधात कर्जदार संस्थेला सरफेशी कायद्यातील तरतूदीनुसार योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील "ड" वर्गातील नगरपरिषदा व नगरपंचायतींना आम आदमी विमा योजना लागू करणेबाबत

**(४१) * ३८२८७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील "ड" वर्गातील नगरपरिषदा व नगरपंचायतीना आम आदमी विमा योजना लागू करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमा योजना लागू न केल्यामुळे नगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रातील शेतमजूर व भूमिहीन लोक सदरील विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त क्षेत्रातील शेतमजूर व भूमिहीन लोक व त्यांच्या पाल्यांना सदरील योजनेचा लाभ देण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) आम आदमी विमा ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सदर योजनेसाठी "राज्यातील ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबातील १८-५९ वयोगटातील रोजगार करणारा कुटुंब प्रमुख किंवा त्या कुटुंबातील एक मिळवती व्यक्ती असेल" असे निकष आहेत.

सदर योजना केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने केंद्र शासनाकडून सदर योजनेची व्याप्ती वाढविल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगर तसेच मिरा भाईंदर परिसरातील वीज ग्राहकांकडून नियमबाह्यरित्या वसुली केल्याबाबत

**(४२) * ३७६७६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगर तसेच मिरा भाईंदर परिसरातील वीज ग्राहकांकडून आर-इन्फ्रा-डी या वीज वितरण कंपनीने कोट्यवधी रुपये नियमबाह्यरित्या वसूल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कंपनीला वीज पुरविण्यासाठी जमिनीत टाकलेल्या केबलचा मोबदला वसूल करण्याची परवानगी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून देण्यात आली परंतू या कंपनीने किती मीटर व किती किंमतीची केबल जमिनीत टाकली याबाबतची कोणतीही माहिती महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त आर-इन्फ्रा-डी कंपनीने केलेल्या केबलवरील खर्चाची माहिती महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे नसताना वसूलीची रक्कम व कालावधी कशाच्या आधारे ठरविण्यात आला तसेच कंपनीने नियमबाह्यरित्या ग्राहकांकडून वसुल केलेली हजारो कोटीची रक्कम शासन वसूल करणार आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे खरे नाही. विद्युत अधिनियम, २००३ नुसार महाराष्ट्र वीज नियामक आयोग वीज वितरण कंपन्याकडून प्राप्त वीज दर याचिकेच्या अनुषंगाने वीज दर निश्चित करते. याचिकेत विविध कामे जसे की केबल टाकणे, मीटर बसविणे, नविन उपकेंद्रे स्थापित करणे याकरिता होणारा खर्च समाविष्ट असतो. सदर याचिकेवर ग्राहकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना व हरकती तसेच विद्युत अधिनियम व विनियमातील तरतूदीचा विचार करून वीज दर निश्चित करतात व त्यानुसार वीज वितरण कंपन्या ग्राहकांकडून विजेच्या बिलाची वसुली करतात.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरद्वारा महाराष्ट्र वीज नियामक आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या वर्षाकरिताच्या बहुवर्षीय वीज दर याचिकेत ४१८६ किलोमीटर HT केबल, ५९३८ किलोमीटर LT केबल, ११३५३ किलोमीटर सर्व्हीस लाईन केबल याचा समावेश केला असून त्याबाबत विहीत कार्यपध्दती अवलंबून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाद्वारे वीज दर निश्चित करताना एकूण रुपये ४८८.२० कोटी इतक्या रकमेचा केबल व्यवसायापोटीचा भांडवली खर्च अनुज्ञेय ठरविला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळा संस्थाच्या इमारतींना नियमित भाडे देण्याबाबत

**(४३) * ३८८६२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आश्रमशाळा चालविण्यात येणाऱ्या संस्थाच्या इमारतीना सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या रक्कमेचे ७५ टक्के भाडे पूर्वीप्रमाणेच सुरु करण्याची मागणी येथील व्यवस्थापनाने संबंधित विभागाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत भाडेच देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर संस्थाना ७५ टक्के भाडे नियमित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) नाही.

अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांना सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५ टक्के इमारत भाडे देण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहांमधील भोजन पुरवठ्याचे काम निविदा न काढताच देण्यात आल्याबाबत

**(४४) * ३९९०२ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४८२ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विद्यार्थी वसतीगृहांमधील भोजन पुरवठ्याचे काम नवीन निविदा न काढताच आधीच्याच पुरवठादारांना देण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारदर्शकतेच्यादृष्टीने ई-निविदा प्रक्रियेवर भर देण्याचे शासनाचे धोरण असताना तसेच शासनाच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार पुरवठ्याच्या कामाचे विकेंद्रीकरण करून लहान तसेच मागासवर्गीय कंत्राटदारांनाही कामे देण्याच्या उद्देशाने काढलेल्या परिपत्रकास स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-निविदा न काढता देण्यात आलेल्या कामांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासंदर्भात सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सध्या भोजन पुरवठा करीत असलेल्या पुरवठादारांची मुदत संपुष्टात आल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजनाची गैरसोय होऊ नये म्हणून यासंदर्भातील ई-निविदा अंतिम होईपर्यंत या पुरवठादारांकडून वसतिगृहासाठी भोजन पुरवठा सुरू ठेवण्यात आलेला आहे.

(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ठेवीदारांची अडवणूक होत असल्याबाबत

**(४५) * ३९१३७ श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२०६ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे आर्थिक देवाण-घेवाण व्यवहार बंद पडल्याने शेतकरी, शिक्षक व अन्य ठेवीदार सभासद ग्राहकांची आर्थिकदृष्टया मोठ्या प्रमाणात अडवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांची वेतन रक्कम तसेच अनेक खातेदार सभासदांच्या हजारो कोटी रुपयांच्या ठेवी व खात्यात शिल्लक रकमा असूनही जिल्हा बँकेचे धनादेश अन्य कोणत्याच बँका स्वीकारत नसून जिल्हा बँकेच्या सुमारे २५० शाखातुन इतर सर्वच रोख व्यवहार बंद पडल्याने सभासदांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेकडून आर्थिक अडचणीचे निवारणार्थ परिणामकारक प्रयत्न व उपाय करण्याऐवजी गैरव्यवस्थापन, चुकीचे निर्णय व अनाठायी कामकाजामुळे बँकेची आर्थिक स्थिती अधिकच हलाखीची होवून ग्राहक सभासदांना कोणताही दिलासा मिळत नसल्याने शासनाने हस्तक्षेप करावा अशी मागणी खातेदारांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ अन्वये नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांच्या अहवालात नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस आर्थिक नुकसान झाल्याचे निष्कर्ष नोंदविले होते. त्यानुषंगाने जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व संचालक व अधिकारी यांची चौकशी सुरू आहे.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जाहिरात न देता व तरतुदींचे उल्लंघन करुन नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकण्यासाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये निर्देश दिले. त्याप्रमाणे बँकेने कार्यवाही सुरु केल्यानंतर काही कर्मचाऱ्यांनी मा.कामगार न्यायालय, नाशिक येथे दावे दाखल केले. सदर दाव्यांमध्ये मा.कामगार न्यायालयाने दिनांक ११/०८/२०१६ रोजी जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिल्याने सदर कर्मचाऱ्यांना कमी करण्यात आलेले नाही. सदर स्थगिती उठविण्यासाठी कार्यवाही करणेबाबत बँकेस दिनांक ०६/११/२०१७ रोजी निदेश दिले आहेत.

नाबार्डच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या निरीक्षण अहवालाच्या अनुषंगाने बँकेने आक्षेपांची पूर्तता केली नाही. सबब बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ११०-A (१)(III) अन्वये बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावास रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २७/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मंजूरी देण्यात आली व सहकार आयुक्तांनी दिनांक २९/१२/२०१७ च्या आदेशान्वये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन बँकेवर प्रशासकाची नियुक्ती केली आहे. तथापि बँकेने प्रशासक नियुक्तीच्या दिनांक २९/१२/२०१७ च्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन (स्टॅम्प) नं.२८०६/२०१८ दाखल केले आहे.

त्यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक ०६/०२/२०१८ च्या आदेशान्वये प्रशासक नियुक्तीच्या आदेशास स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) येथील शासकीय वसतिगृहास सुविधा पुरविणेबाबत

**(४६) * ३८८८९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथील जव्हार प्रकल्पांतर्गत असलेल्या मुलींच्या शासकीय आदिवासी वसतिगृहातील रिक्त पदे, कायमस्वरुपी इमारत व असुविधांबाबत मा.आदिवासी विकास मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग व पोलीस अधिक्षक, पालघर यांच्याकडे समर्थन या संस्थेने लेखी पत्राद्वारे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वसतिगृहाला कायमस्वरुपी इमारत व सोयी-सुविधा पुरविणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) होय.

(२) मोखाडा, (जि.पालघर) येथील मुलींचे शासकीय वसतिगृहासाठी १ एकर जागा उपलब्ध झाली आहे.

नविन इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

चालू शैक्षणिक वर्षात मोखाडा येथील मुलींचे वसतिगृहात एकूण ७४ विद्यार्थीनींना प्रवेश दिला असून प्रवेशित विद्यार्थीनींना मोफत निवास, भोजन व इतर शैक्षणिक /मुलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहे.

सदर वसतिगृहासाठी ६ पदे मंजूर असून ४ पदे भरलेली आहेत. रिक्त असलेले कनिष्ठ लिपीक या पदाच्या भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच वसतिगृहात सध्या ठेकापध्दतीने दैनंदिन भोजन व्यवस्था असल्यामुळे मंजूर कामाठी पद आश्रमशाळेकडे वर्ग केले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही

-----------------

## रायगड जिल्हयात सर्व तालुक्यांना ठक्कर बाप्पा योजनेचा समान निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) * ३८६६८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अनुसूचित जमाती असलेल्या गाव पाडयांचा विकास करण्यासाठी शासनामार्फत राबवल्या जाणाऱ्या ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सन २०१७- १८ या वर्षाकरीता रुपये १ कोटी, २८ लाख, ७६ हजार निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत जिल्हयातील एकूण २६ योजना मंजूर असणे, १५ तालुक्यांपैकी केवळ ७ तालुक्यांना ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत निधीची तरतूद केली असून त्यापैकी कर्जत तालुक्यात ११ योजनांना शासनाने मंजूरी दिली आहे तर इतर ६ तालुक्यांसाठी अत्यल्प निधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अन्य तालुक्यांना मंजूर झालेला विकास निधी मिळणे तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षामध्ये ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत टीएसपी क्षेत्रासाठी रुपये ६०.०० लक्ष तर ओटीएसपी क्षेत्रासाठी रुपये ७०.०० लक्ष इतका निधी प्राप्त आहे. रायगड जिल्ह्यामध्ये टीएसपी क्षेत्रात केवळ कर्जत तालुक्यातील काही गावे असल्याने सदर निधी पुर्णत: त्या गावांसाठी वापरण्यात येतो. तर ओटीएसपी क्षेत्रात रायगड जिल्ह्यातील उर्वरित १४ तालुके व कर्जत तालुक्यातील काही गावांचा समावेश आहे. त्यामुळे ओटीएसपी क्षेत्रासाठी प्राप्त झालेल्या निधीपैकी कर्जत तालुक्यातील ५ कामांसाठी रुपये १२.८३ लक्ष व इतर ६ तालुक्यातील १३ कामांसाठी रुपये ३६.१७ लक्ष इतका निधी मंजूर केलेला आहे.

(३) ओटीएसपी क्षेत्रासाठी उपलब्ध केलेल्या निधीपैकी अद्याप रुपये २१.०० लक्षचा निधी शिल्लक असून त्यामधून इतर तालुक्यातील पात्र ठरणाऱ्या कामांचा विचार करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४८) * ३९३३९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७८४ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एक लाख सात हजार सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण झाले असून ४० मोठ्या संस्थांसह अनेक संस्थांमध्ये रुपये ९७ कोटी ४९ हजाराचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळलेल्या सहकारी संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, संचालक व कर्मचारी यांचेवर कारवाई होण्याच्यादृष्टीने फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे. प्रत्यक्षात रुपये १०५ कोटी १० लाख ५१ हजार इतक्या रकमेचा अपहार व गैरव्यवहार झालेला आहे.
(२) वैधानिक लेखापरिक्षकांकडून फौजदारी गुन्हे दाखल केलेले असल्याने तसेच त्यापुढील कार्यवाही मा.न्यायालयाच्या स्तरावरुन होत असल्याने, सदर प्रकरणी शासकीय चौकशीची आवश्यकता नाही.
(३) लागू नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित आश्रम शाळांमधील प्रलंबित समस्याबाबत

**(४९) * ३९०५६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित आश्रम शाळांमधील शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निकाली काढण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनातील १९ मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.आमदार, श्री.नागो गाणार यांनी त्यांचे दिनांक १६/१२/२०१७ च्या पत्रान्वये "अनुदानित आश्रमशाळेची वेळ बदलणे, काम नाही वेतन नाही शासन निर्णय रद्द करणे, शिक्षकेतर व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती देणे, शिक्षकांचे वेतन देयक मंजूर करतांना बायोमेट्रीक स्लिप न तपासणे, महिन्याच्या एक तारखेस कर्मचाऱ्यांचे वेतन देणे, कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निकाली काढणे, डीसीपीएस कपात बंद करणे, महाराष्ट्र दर्शन भत्ता देणे अनुदानित आश्रमशाळांसाठी स्वतंत्र वेतन पडताळणी पथकाची निर्मिती करणे, शिक्षकांना रात्रपाळीची सेवा न लावणे, स्वयंपाकी मदतनीस व प्रयोगशाळा परिचर यांना दिर्घसुट्टी न देणाऱ्या

मुख्याध्यापक व संस्थाचालकांवर दंडात्मक कार्यवाही करणे शालेय शिक्षण विभागाची सर्व परिपत्रके जशीच्या तशी लागू करणे, उच्च माध्यमिक चे वर्ग जोडल्यास विद्यार्थी संस्थेनुसार चतुर्थश्रेणी कर्मचारी मंजूर करणे" अशा मागण्या केलेल्या आहेत. कालबद्ध पदोन्नतीचा प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात येत आहे. क्षेत्रियस्तरावरील कार्यवाही संबंधित मागण्यांवर उचित कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधितांना दिलेले आहेत. अन्य मागण्यांसदर्भात क्षेत्रिय यंत्रणांचे अभिप्राय घेवून उचित निर्णय घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळेगाव दाभाडे (जि.पुणे) येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(५०) * ४०५३५ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अॅड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव दाभाडे (जि.पुणे) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानाचे भव्य स्मारकात रुपांतर करुन तेथे वाचनालय आणि अभ्यासक व संशोधकांना ग्रंथालय स्थापन करण्याची मागणी तळेगावांतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिलेल्या भेटीच्या वेळी प्रस्तावित भूखंड नगरपालिकेच्या माध्यमातून हस्तांतरीत करुन स्मारकासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन देऊन यासाठी आरक्षित केलेल्या सुमारे २९ गुंठा जागेचे आरक्षण शासनाने रद्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१), (२), (३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दिनांक ०९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त विविध उपक्रम हाती घेण्यात आलेले असून सदर शासन निर्णयातील भाग-१ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टया महत्वाच्या स्थळांचा विकास करणे या अतंर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या बंगल्याची डागडूजी व सुशोभिकरणाच्या कामास रुपये ९९.९९ लक्ष रकमेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाले असून कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन सदर निधी संबंधित प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात येईल.

-----------------

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत

**(५१) * ४००१५ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.च्या प्रशासकीय मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेच्या प्रशासकीय मंडळाच्या तत्कालीन अध्यक्ष यांच्याविरोधातील तक्रारीबाबत सहकार आयुक्त, पुणे यांचेकडून तीन महिन्यात स्वतंत्र चौकशी करण्याचे निर्देश मा.सभापती यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, सहकार यांना दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या लेखी पत्राबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२), (३) व (४) दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या बैठकी दरम्यान बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. च्या प्रशासकीय मंडळाच्या कामकाजाबाबत तत्कालीन अध्यक्षांची विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असल्याचे निदर्शनास आणण्यात आले. सद्य:स्थितीत संबंधितांची निवेदने आणि सहकार आयुक्त यांनी सादर केलेल्या अहवालाचे आधारे दोषारोपपत्रे सुधारित करणे व एकत्रित विभागीय चौकशी आदेशित करण्याचे अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागास प्रकरण अभिप्रायार्थ सादर केले आहे. त्यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येईल.

मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक २३ जानेवारी, २०१८ चे पत्र पुढील कार्यवाहीसाठी सहकार आयुक्तांस पाठविण्यात आले आहे. दिनांक २० डिसेंबर, २०१७ च्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## आदिवासी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठीचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(५२) * ३८९८२ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ आदिवासी बांधवांपर्यंत पोहचत नसल्याने कोटयवधीचा निधी विना खर्च शासनाकडे परत जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांचा लाभ थेट आदिवासी बांधवापर्यंत पोहचावा व यासाठी वितरीत करण्यात आलेला निधी नियमित खर्च व्हावा याकरिता आदिवासी विकास विभागांतर्गत आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णू सावरा :** (१) आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीत रुपये ९११० कोटी पैकी माहे जानेवारी, २०१८ अखेर रुपये ३८७७ कोटी खर्च झाला असून खर्चाची टक्केवारी ४३% इतकी होती. दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ पर्यत ४७ टक्के खर्च झाला असून मार्च, २०१८ अखेर विभागास उपलब्ध करून दिलेला पुर्ण निधी खर्च करण्याचे नियोजन केलेले आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये एकूण ९२.१८% निधी खर्च झालेला आहे.

(२) राज्यातील २९ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयापैकी ११ संवेदनशील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांकरीता भा.प्र.सेवेतील प्रकल्प अधिकाऱ्याची नेमणूक करण्यासाठी तरतूद आहे. सद्य:स्थितीत १२ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांचा कार्यभार भा.प्र.से. अधिकाऱ्यांकडे आहे. तसेच ४ पैकी ३ अपर आयुक्त, आदिवासी विकास या पदावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकारी आहेत.

(३) आदिवासी उपयोजनेंतर्गत जास्तीत जास्त खर्च होवून योजनांचा लाभ आदिवासींपर्यंत पोहचण्यासाठी वेळोवेळी जिल्हानिहाय व विभागनिहाय खर्चाचा आढवा घेण्यात आला असून उपलब्ध निधी पुर्णत: खर्च करण्याच्या अनुषंगाने निर्देशित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील आश्रमशाळा इमारतीच्या कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत

**(५३) * ३९००१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय पोष्ट बेसिक आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम मागील सात वर्षापासून प्रलंबित असून ठेकेदार इमारतीचे बांधकाम प्रलंबित ठेऊन शासनाकडून वेळोवेळी निधी वाढवून घेऊन शासकिय निधीचा अपहार करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे तसेच या बांधकामाची मूळ मंजूर रक्कम किती व आतापर्यंत किती रक्कम खर्च झाली आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) व (२) गुहीर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय पोष्ट बेसिक आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकामाची मूळ मंजूर रक्कम रुपये ३,७९,९०,२१७/- इतकी आहे. आतापर्यंत सदरच्या कामावर रुपये ३,२२,३५,७७८/- इतका निधी खर्च झालेला आहे. सदरहू बांधकाम माहे जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) सदरहू प्रकरणी दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, नवी मुंबई यांचेमार्फत कामाची तपासणी करण्यात आलेली आहे.

इमारतीच्या बांधकामाच्या कालावधीत वाळू उपसा करण्यावर बंदी आल्याने वाळू वेळेत उपलब्ध होत नसल्याने कामास विलंब झालेला आहे.

-----------------

## रत्नागिरी औद्योगिक वसाहतीतील अनधिकृत कामांबाबत

**(५४) * ३८०८७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी औद्योगिक वसाहतीमध्ये अनधिकृत बांधकामे, व्यापारी भूखंडावर रहिवाशी वापर तसेच भंगार ठेवण्यासाठी अनधिकृतपणे जागा भाडयाने देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शिरगाव येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी व औद्योगिक महामंडळाकडे अनेकदा तक्रारी करुन सुध्दा संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शिरगाव येथील ग्रामस्थानी अनधिकृत बांधकामाबाबत तक्रारी केलेल्या आहेत. सदर अनधिकृत बांधकाम हटविण्याची कार्यवाही नियमित होते.
(३) महामंडळाच्या रस्त्याच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे/भूखंडाच्या वापरातील बदल व अनधिकृत भंगार व्यवसायिक यांना समज व नोटीसा देण्यात आल्या असून पोलीस बंदोबस्त उपलब्ध झाल्यानंतर अनधिकृत बांधकामे हटविणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची इतर कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृष्णूर (ता.नायगांव, जि.नांदेड) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(५५) * ३८५३० श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णूर (ता.नायगांव, जि.नांदेड) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील पाणी वाहून नेणाऱ्या वाहिनी दुरुस्तीसाठी लाखो रुपये खर्च होऊन देखील वाहिनी वारंवार फुटून लाखो लीटर पाणी वाया जात असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

नांदेड ते कृष्णूर मुख्य जलवाहिनी तसेच कृष्णूर औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत जलवितरण व्यवस्थेचे देखभाल व दुरूस्तीचे काम कंत्राटदारामार्फत करण्यात येत असून काही कारणामुळे पाणीगळती झाल्यास युध्द पातळीवर दुरुस्तीचे काम करून पाणी गळती थांबविण्यात येते.

कृष्णूर औद्योगिक क्षेत्रास होणाऱ्या पाणीपुरवठ्यात माहे एप्रिल, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत पाणी गळतीचे प्रमाण अल्प आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारस येथील (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील प्रस्तावित वीज प्रकल्प बंद करण्यात आल्याबाबत

**(५६) * ३८०७७ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७३६ ला दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारस औष्णिक (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील प्रस्तावित नवीन विस्तारित वीज प्रकल्प बंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ६६० मेगावॅटच्या प्रकल्पाकरिता ८९ शेतकऱ्यांकडून ११० हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्प बंद करणे तसेच सदर प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीबाबत शासनस्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

पारस येथे सध्या २ x २५० मे.वॅ. क्षमतेचे संच कार्यरत आहेत. तसेच तेथे कोळश्यावर आधारित १ x २५० मे.वॅ. क्षमतेचा औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प प्रस्तावित आहे. परंतु सदरचा प्रकल्प तूर्त स्थगित ठेवण्यात आलेला आहे.

(२) व (३) केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या दिनांक १३/११/२००९ च्या पत्रानुसार १३ व्या योजनेच्या अंतर्गत नवीन प्रकल्प हे फक्त Supercritical Technology वर आधारित राहतील व केंद्रीय विद्युत प्रधिकरणाकडून असे कळविण्यात आले आहे की, १ x २५० मे.वॅ. प्रकल्पा ऐवजी १ x ६६० मे.वॅ. चा सुपर क्रिटीकलचा प्रकल्प उभारण्यात यावा. परंतु पारस या ठिकाणी ६६० मे.वॅ. प्रकल्पासाठी पाण्याची उपलब्धता नसल्यामुळे सदर प्रकल्प तूर्त स्थगित ठेवण्यात आला आहे. तथापि सदर प्रकल्पाच्या परिसरातील शिल्लक असलेल्या जागेवर ६० मे.वॅ. क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प महानिर्मिती कंपनीमार्फत उभारण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाटातील (जि.अमरावती) आश्रमशाळांच्या समस्यांबाबत

**(५७) * ३७७१८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाटातील (जि.अमरावती) आश्रमशाळांसाठी असलेल्या स्वतंत्र संहितेचे शासनाकडून पालन होत नसणे, विद्यार्थ्यांच्या भोजन अनुदानात चौपट तफावत असणे तसेच इमारत अनुदान, कर्मचारी संख्या व पद मान्यतेमध्ये देखील तफावत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१) अनुदानित आश्रमशाळांना आश्रमशाळा संहितेतील तरतूदीप्रमाणे १०० टक्के वेतन अनुदान, प्रतिविद्यार्थी प्रतिमाह रुपये ९००/- परिरक्षण अनुदान, ८ व १२ टक्के आकस्मिक अनुदान, सा.बां.वि. ने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५ टक्के इमारत भाडे प्रदान करण्यात येते.

धारणी प्रकल्पात अंतर्गत अनुदानित आश्रमशाळांमध्ये आश्रमशाळा संहितेनुसार विहित केलेली ७२२ पदे मंजूर असून ६८६ पदे भरण्यात आली आहेत.

(२) परिरक्षण अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील रिक्त पदेही लवकरच भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय अर्थसहाय्य योजनेतून दिलेले धनादेश न वटता परत आल्याबाबत**

**(५८) * ३८२८२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील गौतम नगरात राहणाऱ्या दिपक इंगळे यांचा माहे मार्च, २०१७ मध्ये विजेचा धक्का लागून मृत्यू झाला असून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून त्यांच्या कुंटुंबियास देण्यात आलेला रुपये २० हजाराचा धनादेश तसेच इतर कुटुंबियांना देण्यात आलेले धनादेश न वटता परत आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लाभार्थ्यांना बँकेने दंड आकारला असल्याने धनादेश देण्याऐवजी रोख रक्कम द्यावी व बँकेकडून आकारण्यात आलेली दंडाची रक्कम प्रशासनाने भरावी अशी मागणी पीडित सपना इंगळे यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पीडितांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे तसेच खात्यात पुरेशी रक्कम नसतानाही धनादेश वितरीत करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) श्रीमती सपना दिपक इंगळे व श्रीमती संगिता सुभाष ठाकरे यांना देण्यात आलेला धनादेश न वटता परत आलेले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) श्रीमती इंगळे व श्रीमती ठाकरे यांना दिलेला धनादेश बँकेच्या संगणकीय प्रणालीतील चुकीमुळे न वटता परत आलेले आहेत. परंतु तहसिल कार्यालय, यवतमाळ यांच्याकडून संबंधितांना देय असलेल्या रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरीता अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निवासी आश्रमशाळांमध्ये सफाई कर्मचारी व सुरक्षारक्षक नेमण्याबाबत

**(५९) * ३८८६३ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या निवासी आश्रमशाळेत स्वच्छता (साफसफाई) कर्मचारी नसल्याचे तसेच रात्री सुरक्षारक्षक हे मानधनावर काम करण्यास तयार नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने स्वच्छता कर्मचारी यांची पदे निर्माण करुन त्वरीत भरणे व पूर्ण वेतनावर रात्री सुरक्षारक्षक नेमण्याची मागणी शाळा व्यवस्थापनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) व (२) नाही.

अनुसूचित जातीच्या मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळा व शासकीय वसतिगृहांच्या साफसफाई तसेच सुरक्षारक्षकाची कामे बाह्यस्त्रोताद्वारे करून घेण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील विजेच्या गैरसोईबाबत

**(६०) * ४०११२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासीबहुल गावातील कासघर, सोनाळे, तुसे, (कातकरी वाडी, डोंगरी पाडा) डोंगस्ते, ओगदा, चिखले (माळीपाडा), अविटघर, मोज, सागमाळ, पिंगेमान येथील कमी दाबाचा वीज पुरवठा, मौजे राईपाडा ते भालतपाडा या रस्त्यालगतचे तसेच इतर जीर्ण झालेले विजेचे खांब, जुनाट झालेल्या विजेच्या तारा, रोहित्रांमध्ये झालेला बिघाड, नवीन मिटरचे पेसे भरून मीटर दिलेले नसणे तसेच काही ठिकाणी विजेचे खांब उभारण्याकडे होत असलेले दुर्लक्ष इत्यादीबाबत लेखी तक्रारी गावकऱ्यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी व दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.ऊर्जा राज्यमंत्री व सचिव, ऊर्जा तसेच कार्यकारी अभियंता, पालघर विभाग विदयुत मंडळ याच्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, महावितरणाच्या विरोधात गावकरी व श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास वाडा महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) श्रमजीवी संघटना यांनी वाडा उपविभागांतर्गत येणाऱ्या वीज समस्येसंदर्भात दिनांक ११/१२/२०१७ रोजी लेखी निवेदन उपकार्यकारी अभियंता, वाडा उप विभाग, जि.पालघर यांना दिलेले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) श्रमजीवी संघटना यांनी वाडा उपविभागांतर्गत येणाऱ्या वीज समस्येसंदर्भात दिनांक ११/१२/२०१७ रोजी लेखी निवेदन उपकार्यकारी अभियंता, वाडा उप विभाग यांना दिलेले असून त्यात एकूण २२ ठिकाणच्या समस्यांचा उल्लेख केलेला आहे. या संदर्भात श्रमजीवी संघटनेला समस्यांच्या उपाययोजनेबाबत दिनांक १८/१२/२०१७ रोजी महावितरण कंपनीकडून सविस्तर उत्तर पाठविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी वाड्या वस्त्यांच्या विकासाबाबत

**(६१) * ३८६६९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील गाव व वाडया-वस्त्यांवरील आदिवासी ठाकूर मागास जमात पिढ्यानपिढ्या स्वातंत्र्य पूर्व काळापासून कायमस्वरूपी डोंगरावर दूर्गम भागात वास्तव्य करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही सदर तालुक्यातील दुर्गम भागातील आदिवासी ठाकूर जमातीच्या २० गाव व वाड्या-वस्त्यांपर्यंत रस्त्यासारख्या पायाभूत सुविधा व विद्युत पुरवठा नसल्याने त्या मुख्य रस्त्यापासून किंवा शाळेपासून ४ ते ५ कि.मी. अंतरावर असल्याने ग्रामस्थ, रूग्ण तसेच विद्यार्थ्यांना पायी प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदिवासी ठाकूर समाजाचा विकास होण्याच्यादृष्टीने सदर गाव, वाड्या-वस्त्यांना सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) रायगड जिल्हयामध्ये एकूण १५ तालुके असून त्यापैकी ६ तालुके आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ठ आहेत. अलिबाग तालुका आदिवासी उपयोजना क्षेत्रात येत नसल्याने सदर तालुक्यामध्ये सामुहिक स्वरुपाची कामे आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रमांतर्गत करता येत नाही. दुर्गम भागातील टिएसपी अंतर्गत गावाशी जोडणाऱ्या रस्त्यांबद्दल जिल्हा नियोजन समितीमध्ये प्राधान्य देणेकरीता सूचना देण्यात आली आहे.

-----------------

## काजळी (ता.तलासरी, जि.पालघर) येथील आदिवासींना वीज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६२) * ३८९८४ श्री.रविंद्र फाटक, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काजळी (ता.तलासरी, जि.पालघर) येथील १३ आदिवासी कुटुंबियांपर्यंत वीज पोहचली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त १३ आदिवासी कुटुंबियांना वीज पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर १३ आदिवासी कुटुंबियाच्या घरांना वीज पुरवठा करण्याच्या कामाचा समावेश “दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना” या योजनेत करण्यात आला असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी नदीवरील उपसा जलसिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(६३) * ३८५३५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी नदीवर सन १९८५ साली उपसा जलसिंचन प्रकल्प उभा करण्यात आला परंतू मागील ३२ वर्षापासून हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही तसेच हा प्रकल्प उभारण्यासाठी घेण्यात आलेले कर्ज शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यांवर वाढल्यामुळे शेतकरी अडचणीत आले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदीवर दोन उपसा सिंचनमधुन (लिफ्ट) कुंडलवाडी, चनापूर या गावातील ८१० हेक्टर तर पाटोदा, माष्टी, शेळगांव आदि गावातील ६९० हेक्टर सिंचनक्षेत्र ओलीताखाली आणण्याचे नियोजन होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्जाची वसूली कुंडलवाडी कार्यकारी सोसायटी शेतकऱ्यांकडून करणार होते परंतू हा प्रकल्प पुर्ण होऊ न शकल्याने शेतकऱ्यांचे कर्ज वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकल्प पूर्ण होण्यासाठी व शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यांवर वाढलेले कर्ज कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) कुंडलवाडी वि.का. सेवा सहकारी सोसायटी, ता.बिलोली या संस्थेने तिच्या सभासदांसाठी १) कुंडलवाडी - शेळगाव - चन्नापूर आणि २) पाटोदा-माष्टी या दोन उपसा जलसिंचन योजनांची सन १९९४ मध्ये उभारणी

केली. सदर दोन्ही योजनांसाठी नांदेड जि.म.स. बँकेने एकूण रुपये २०५.२८ लाख इतके कर्ज मंजूर केले होते. तथापि गोदावरी नदीच्या पात्रात पाण्याचा साठा कमी असल्याने सदर योजना कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत.

दरम्यान उपरोक्त उपसा जलसिंचन संस्थांसाठी वैद्यनाथन पॅकेज मधून प्राप्त रुपये ३,००,९९,०००/- इतकी रक्कम कुंडलवाडी वि.का.सेवा सहकारी सोसायटीने दिनांक २७/०८/२००९ रोजी नांदेड जि.म.स. बँकेकडे भरणा केली.

सद्य:स्थितीत दिनांक ३१/०१/२०१८ अखेर या योजनांचे रुपये २०५.२८ लाख कर्ज व त्यावरील व्याज रुपये ६३६.७२ लाख असे एकूण रुपये ८४२.०० लाख इतकी थकबाकी आहे.

-----------------

## विदर्भातील बंद सुतगिरण्या सुरु करण्याबाबत

**(६४) * ३८१३१ श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक २७४४१ ला दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील बंद सुतगिरण्या पुन्हा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद पडलेल्या सुतगिरण्या सक्षम बनवून कायमस्वरूपी सुरू व्हाव्यात याकरिता धोरण आखण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद सूतगिरण्या पुन्हा सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावामध्ये अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील सुतगिरण्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ बाबत दिनांक १७/०२/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून यामध्ये सूतगिरणीस एक वेळची निर्गमन योजना (One Time Exit Policy) लागू करण्यात आली आहे.

(३) व (४) अकोला जिल्ह्यातील निळकंठ सहकारी सूतगिरणी मर्या, अकोला या गिरणीचा आधुनिकीकरणाचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाने मान्य करुन त्यानुषंगाने राष्ट्रीय सहकारी विकास निगमास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.